## ‘ललिता देऊळकर व यंग इंडिया रेकॉर्डस’

---

दहा एक वर्षं झाली असतील. ‘वीर सावरकर’ बोलपटाचा एक खास खेळ दक्षिण मुंबईत कुलाबा येथे टी. आय. एफ. आर. च्या परिसरात आयोजित केला होता. बाबूजी (सुधीर फडके) व ललिताबाई फडके खास त्याकरिता आले होते. पूर्ण भरलेलं सभागृह पाहून बाबूजी अतिशय प्रसन्न झाले. सत्कार समारंभानंतर चित्रपटाचा परिचय करून दिल्यावर खेळ सुरू झाला व काही वेळानं दोघे बाहेर आले. सूर्यास्ताची वेळ होती. खुर्चीत बसून दोघांनीही पश्चिमेकडचा तो सोहोळा डोळे भरून बघितला. मग ऑफिसच्या गाडीतून त्यांना घरी सोडायला निघालो. कुलाबा ते दादर ह्या प्रवासात त्यांना सोबत करायची अनोखी संधी मला मिळाली होती. आमचं जुन्या गाण्यांचं व तबकड्यांचं (ध्वनिमुद्रिका) वेड त्यांच्या परिचयाचं होतंच. गाडीत मागच्या सीटवर दोघंही विसावल्यावर बाबूजींनीच विचारलं, “आमच्या हिच्या गाण्यांच्या रेकॉर्डस आहेत का हो तुमच्याकडे? हिनं पुष्कळ गाणी म्हटली आहेत बरं का? पण आम्ही काही त्या रेकॉर्डस जपून नाही ठेवू शकलो. कुणाकडं असतील तर ऐकायच्या आहेत एकदा”. त्यावर मी म्हणालो, “अवश्य. आमच्या मुलाणींच्याकडे सगळी गाणी मिळतील ऐकायला. पण आमच्याकडं ‘यंग इंडिया’ लेबल रेकॉर्डवरची काही गाणी आहेत. ती मात्र गैरफिल्मी आहेत. मराठी गाणी ‘ललिता देऊळकर’ ह्या नावानं तर हिंदी गाणी ‘ललिता देवी’ ह्या नावानं आहेत. त्याविषयी काही आठवतंय का?” हे ऐकून ललिताबाई चमकल्याच. इतक्या जुन्या रेकॉर्डस कुणी जपून ठेवल्या असतील व त्या ऐकल्यापण जात असतील यावर त्यांचा

विश्वासच बसेना. दोन चार गाण्यांचे शब्द व चाल सांगितल्यावर मात्र त्या खुलल्या व आपणहून मोकळेपणी त्या काळातल्या आठवणी सांगू लागल्या. "माझीच गाणी ती. हयाच दोन्ही नावानी प्रसिद्ध झाली होती. पण आता पार विसरून गेले होते हो. अहो, हयाच गाण्यांमुळं मला पार्श्वगायनाची संधी मिळाली होती बरं. साधारण १९४०-४५ च्या सुमाराची ही गाणी आहेत. एका गुजराथी माणसाच्या पुढाकारानं स्वदेशी ध्वनिमुद्रिका बनवायचा कारखाना मुंबईत १९३७ मध्ये सुरू झाला. रेकॉर्डच्या लेबलवर तिरंगी झेंडा छापलेला असे. त्यामुळं त्याला 'झेंडा छाप' रेकॉर्डस म्हणत. त्यात शांताराम बापूंचा पण सहभाग होता. प्रथम 'प्रभात फिल्म कं.' व मग 'राजकमल कलामंदिर' च्या बोलपटांतली गाणी हया कंपनीच्या लेबलवर बनत. त्यांचा कारखाना होता वडाळयाला तर ध्वनिमुद्रणं मात्र व्हायची फोर्टातल्या मेडोस रस्त्यावरच्या तीन मजली इमारतीमध्ये. आजच्या अकबर अलीच्या समोरच्या गल्लीत. [अलिकडंच हया इमारतीला आग लागली (की लावली गेली?)]. ध्वनिमुद्रणांचं काम सुद्धा अगदी कारखान्यातल्या सारखं कामगारांच्या पाळया लावून व्हायचं. गीतकार, संगीतकार, गायक / गायिका सुद्धा अनेकदा पगारी नोकर असत. सकाळी दहा ते संध्याकाळी सहा असं काम चालायचं. मध्ये एक तास जेवणाची सुटी. आम्ही सगळे डबे घेऊनच जायचो. रोजच अंगत पंगत असायची. तिची सर आजच्या पंचतारांकित हॉटेलातल्या दिमाखदार जेवणाला नाही. रोज आठ दहा गाणी तरी मुद्रित व्हायचीच. त्यात पुन्हा हिंदी, मराठी व गुजराथी साठी स्वतंत्र विभाग. दत्ता डावजेकर त्यांच्याकडं कामाला होते. तो काळ वाटव्यांच्या भावगीतांच्या मोहिनीचा होता. 'वारा फोफावला' या गाण्याच्या रेकॉर्डच्या विक्रमी

खपामुळं दर्यागीतं खूप खपत. ज्योत्स्नाबाई भोळे यांचं गाजलेलं 'आला खुशीत समिंदर' हयाच काळातलं व हयाच लेबलवरचं. मग डावजेकरांनी पण दोन दर्यागीतं लिहिली, त्यांना चाल लावली व माझ्याकडून गाऊन घेतली. त्यातल्या एकाचे शब्द 'तुफान, तुफान' असे काहीसे होते असं आठवतंय. हिंदी मध्ये काही गाजलेल्या गाण्यांच्या चालीवर नवीन शब्द लिहून घेऊन गाणी करायचे. त्या तबकडयांना 'व्हर्शन रेकॉर्डस' असं म्हणायचे. ती गाणी पण खूप खपायची. त्यातलीच माझी काही गाणी ऐकून बॉंबे टॉकीजच्या संगीतकार सरस्वतीदेवींचं माझ्याकडं लक्ष गेलं. अगदी देविकाराणींच्या काळापासून मी बॉंबे टॉकीजच्या बोलपटांतून छोटी मोठी कामं करत होतेच. सरस्वतीदेवींनी संगीत दिलेल्या गाण्यांत कधी कधी कोरसमध्ये गात पण असे. पुढं शशधर मुखर्जी यांनी फुटून 'फिल्मिस्तान'ची स्थापना केली. सरस्वतीदेवींनी त्यांच्यापाशी माझ्या नावाची जोरदार शिफारस केली व त्यांच्यामुळेच पार्श्वगायिका म्हणून माझी वर्णी लागली. सी. रामचंद्र हयांच्या 'साजन' ची गाणी मला मिळाली. 'यंग इंडिया' रेकॉर्डसवर मी किती गाणी गायले हे सांगू शकणार नाही. पण त्या रेकॉर्डसमुळंच मी प्लेबॅकच्या क्षेत्रात आले हे नक्की."

ही माहिती ऐकून माझ्याप्रमाणे बाबूजी पण त्यांच्या आठवणींनी चकित झाले. इतका वेळ सीटवर डोकं मागं टेकून व डोळे मिटून शांतपणे ऐकत बसले होते. ते सावरून बसले व म्हणाले, "बरं का चांदवणकर, मी इथं कुणीही नव्हतो ना, तेव्हांपासून ही गाणी गाते आहे. आमच्या संसाराच्या सुरूवातीला हिच्या कमाईचा वाटा फार मोठा असे. तिच्या गळयाला शोभतील अशी फार गाणी मी नाही देऊ शकलो. त्याची

मला फार खंत वाटते आहे." त्यावर मी म्हणालो, "असं का म्हणता बाबूजी? एकाच 'सुवासिनी' बोलपटातली मोजकीच गाणी उदाहरणासाठी पुरेशी आहेत ना? ग.दि.माडगूळकरांनी 'एरी मैं तो प्रेम दिवानी' चं मराठी रूपांतर 'मी तर प्रेम दिवाणी' असं केलं.आशाबाईंनी त्या गाण्याच्या चालीचं सोनं केलंच पण पिलु रागातली तुमची वेगळी चाल ललिताबाईंनी किती उत्कटतेनं गायली आहे.शिवाय भीमसेनजींच्या बरोबरची तोडी रागातली बंदिश?"

पसंतीची मान डोलावून बाबूजी म्हणाले, "अहो, असा एखादाच अपवाद.आम्हाला दोघांना मिळून हिची सगळी गाणी एकदा ऐकायची आहेत.हया चित्रपटाच्या व्यापातून एकदा मोकळा झालो की मुलाणींच्या घरी जमू यात." बोलता बोलता शिवाजी पार्कला कधी पोहोचलो ते समजलंच नाही.वर्षं निघून गेली.एकत्र बसून गाणी ऐकण्याचा योग मात्र कधी आलाच नाही.आठ वर्षांपूर्वी बाबूजी गेले.आता तर ललिताबाई पण गेल्या.

अगदी अलिकडे एका प्रकल्पाच्या निमित्तानं सर्व संग्राहकांकडच्या 'यंग इंडिया' कंपनीच्या ध्वनिमुद्रिका गोळा करायचं व गाणी मुद्रित करायचं काम चालू झालं.त्यातल्या 'ललिता देऊळकर' व 'ललिता देवी' हया नावाच्या रेकॉर्डस पाहून त्यांच्या भेटीची आठवण झाली.त्यात अजूनपर्यंत आठ मराठी व चार हिंदी रेकॉर्डस मिळाल्या आहेत.एकूण सोळा मराठी गाण्यांतले दोन अभंग असून त्यातला तुकारामाचा एक अभंग मा.परशराम सह म्हटलेला आहे.त्याचं संगीत पी.मधुकर म्हणजेच मधुकर पेडणेकर यांचं आहे.उरलेली गाणी भावगीतं असून

त्यात तीन दर्यागीतं आहेत. ती दत्ता डावजेकर व दत्तू बांदेकर यांची आहेत. 'तारूं आलं किना-याला', 'तुफान, तुफान' व 'नाखवा करूं अंधारी शिकार' ही ती दर्यागीतं किंवा कोळीगीतं. इतर भावगीतं कवि शांताराम आठवले व बी. महाबळ यांची आहेत. संगीत दत्ता डावजेकर व श्रीधर पार्सेकर हयांचं आहे. एकच भावगीत बाळासाहेब दांडेकर यांचेबरोबर असून बाकीची सगळी सोलो प्रकारातली म्हणजे एकल आहेत. भावगीतांचे विषयही प्रेमगीतांचे असून त्यांचे बोल - 'सजणा का तू रूसला', 'नको बोलू रे सजणा', 'लावू नको मज हात', 'जिवलग नाही घरी', 'जिवास जडले पिसे', 'रामा कुठे शोधू तुला', 'तुझ्या डोळयात भरला जादू', 'उडून गेला ग पोपट' असे असून 'जो जो बाळा' [चाल - 'धीरे धीरे आ रे बादल'] हे एक अंगाई गीत पण आहे. 'कां कोप असा' हया गीताची चाल 'अब तेरे सिवा कौन मेरा' हया गाण्याची आहे. 'किस्मत' बोलपटातल्या हिंदी गाण्यांचे मराठी अवतार ऐकतांना आज खूप मजा वाटते.

'ललिता देवीं'च्या आवाजात चार हिंदी गीतांच्या ध्वनिमुद्रिका असून एकूण सात गाणी त्यांची व एक गाणं बिमलाकुमारी (म्हणजेच लाहोरच्या विख्यात अभिनेत्री व गायिका झीनत बेगम) हयांच्या आवाजात आहे. सातपैकी सहा गाणी सोलो असून एक युगल गीत मि. सादिक सह गायिलं आहे. काही गाणी कवि फिरोझ व मयूरध्वज यांनी लिहिली आहेत. संगीतकारांची नावं मात्र लेबलवर आढळत नाही. या गीतांच्या चाली त्या काळच्या गाजलेल्या गाण्यांच्या आहेत. उदा. 'मन धीरे धीरे रोना' हे 'खजांची' बोलपटातलं गाजलेलं गाणं ललिता परूळकरांच्या ['ललितादेवीं'च्या] आवाजात ऐकायला

मिळतं.ललिता देवींच्या ऊंच आवाजातली ही गाणी एकायला फार गोड आहेत.ही गाणी पुन्हा एकदा ऐकायला आता त्या हयात नाहीत.मात्र पुढच्या कित्येक पिढया सी.डी.आयपॉड व इंटरनेटच्या माध्यमातून त्यांचा आस्वाद घेऊन अभ्यास करू शकणार आहेत.

---

डॉ.सुरेश चांदवणकर, नेव्हीनगर, कुलाबा मुंबई
२७ मे २०१०. (०)९९२०८१३३३६
chandvankar.suresh@gmail.com


बाबूजी व ललिताबाई – सहजीवनाच्या शुभारंभी



ललिता देऊळकर यांची गाणी

------------------------------

1] DA 6699 नाखवा करूं अंधारी शिकार
- सह बाळासाहेब दांडेकर
लावू नको मज हात - बाळासाहेब दांडेकर
कवि - दत्तू बांदेकर

------------------------------------------------------------

2] DA 11235 कां  कोप असा
जो जो बाळा
कवि - शांताराम आठवले

------------------------------------------------------------

3] DA 11373 सजणा का तू रूसला
उडून गेला ग पोपट
कवि - दत्तू बांदेकर

------------------------------------------------------------

4] DA 11374 नको बोलू रे सजणा
किती बाई मन ध्याले
कवि - दत्तू बांदेकर

------------------------------------------------------------

5] DA 11423 जिवलग नाही घरी
जिवास जडले पिसे
कवि - शांताराम आठवले, संगीत - श्रीधर पार्सेकर

---

6] DA 11649 तारूं आलं किना-याला
तुफान तुफान
चाल व शब्द - दत्ता दावजेकर

---

7] TM 8637 रामा कुठे शोधू तुला
तुझ्या डोळयात भरला जादू
कवि - बी. महाबळ

---

8] DA 11873 एकच टाळी झाली
- अभंग, सह - मा. परशराम
देवा येसी का न येसी - तुकाराम अभंग
संगीत - पी. मधुकर

---

ललिता देवी (देऊळकर) यांची हिंदी गाणी

---

1] MM 7167 नदी किनारे नदी किनारे
छाई घटा है काली
कवि - फिरोझ,

---

2] DA 6356 ए मन धीरे धीरे रोना
नैनो के बान रीत अनोखी - बिमलाकुमारी

---

3] DA 11282 केहती है दिवाली
पंछी जा सुख संदेशा ला
कवि - फिरोझ और मयूरध्वज

My National Voices, Series No.8

---

4] DA 11367 गई जवानी रही कहानी
नयनका इशारा हो
मि . सादिक सह
कवि - फिरोझ

---